सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००१४४–२०१५

नियमित दिवाणी दावा क्र.३१/२०१५

निशाणी क्र. ६२ वरील आदेश

प्रस्ततुचा अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेऊन दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.१ रामजी यशवंत खोत हे दि.२१/१२/२०२४ रोजी दहिबाव, ता.देवगड येथे मयत झाले आहेत. सदर प्रतिवादीचे प्रतिवादी क्र.१अ व १ब हे वारस आहेत. तरी सदर प्रतिवादी क्र.१ यांचे वारस दाव्यात समाविष्ट करण्यास व त्याप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे.

०४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी निरंतर ताकीद या करिता दाखल केलेला आहे.

०५. सदर कामी नि.क्र.६७ येथे प्रतिवादी क्र.१ रामजी यशवंत खोत यांच्या मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी उशिराने दाखल केलेला आहे. अर्ज नि.क्र.६० येथे आदेश पारित करुन मयत प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द झालेली अबेटमेंट वादी यांनी खर्चाची रक्कम भरल्यानंतर रद्द करण्याबाबत आदेश पारित करण्यात आला आहे. तसेच अर्ज नि.क्र.६१ येथे आदेश पारित करुन मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास

झालेला विलंब वादी यांनी खर्चाची रक्कम भरल्यानंतर माफ करण्याबाबत आदेश पारित करण्यात आला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता, मयत प्रतिवादी क्र.१ यांच्या वारसांविरुध्द प्रस्तुत दावा पुढे चालवण्याचा अधिकार वादी यांना असल्याचे दिसून येते. तसेच, न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना आणि वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्त्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- <u>आदेश</u> -**

१. अर्ज नि.क्र.६२ मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी अर्ज नि.क्र.६० व ६१ मध्ये पारित केलेली खर्चाची जमा केल्यानंतर प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारसांना दाव्यात समाविष्ट करावे व १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.10.06 16:34:58 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिनांकः०६/१०/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड